संस्थापक
साने गुरुजी
साप्ताहिक
साधना
Weekly Sadhana
Date of issue
शनिवार,
२४ सप्टेंबर २०२२
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ४८)

कोलंबियातील निवडणूक आणि
लॅटिन अमेरिकेतल्या 'पिंक टाइड'ला
आलेलं नवं उधाण
– अशोक राजवाडे

हबीब तन्वीर यांच्या जन्मशताब्दी प्रारंभानिमित्त लेख :

# पारावरची नाटके सशक्त व्हायला हवीत!

– केशव साठ्ये

रंगमंचाला एक नवे परिमाण देणारे, सर्वसामान्यांच्या अभिव्यक्तीचे साधन बनवणारे, शहरी–ग्रामीण अशा दोन्ही घटकांना रंगभूमीवर एकरूप करण्याची ताकद असलेले हे रंगकर्मी आजही जुन्या नाट्यरसिकांच्या, अभ्यासकांच्या स्मरणात असतील. धर्म, जातिव्यवस्था हे त्यांच्या अनेक नाटकांचे केंद्रबिंदू होते. आणि हे सारे ते निगुतीने प्रेक्षकांसमोर ठेवायचे. पोंगा पंडित, आग्रा बाजार ही त्यांची आणखी काही गाजलेली नाटके. भवभूतीपासून शेक्सपिअरपर्यंत आणि ऑस्कर वाइल्डपासून प्रेमचंदपर्यंत अनेक नाटककारांचे, लेखकांचे संदर्भ आणि प्रवाह त्यांच्या नाटकांतून दिसायचे.



'चरणदास चोर' या नाटकाच्यावेळी रंगमंचामागे हबीब आणि मोनिका तन्वीर, जयपूर राजस्थान, ऑक्टोबर २००२

Scanned with CamScanner

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
२४ सप्टेंबर २०२२
वर्ष ७५ / अंक – ६.

संपादक :
**विनोद शिरसाठ**
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
Photo by Sudhanva Deshpande.
व्यवस्थापक आणि अक्षररचना : **सुरेश माने**

मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph.No. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा वरील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते **क्र.60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

Follow us :
weeklysadhana.in
facebook.com/weeklysadhana/
twitter.com/WeeklySadhana
YouTube/WeeklySadhana

४ **दुर्योधनी संस्कृतीत गटांगळ्या खाणारे जग!**
... संपादकीय

७ **कोलंबियातील निवडणूक आणि लॅटिन अमेरिकेतल्या 'पिंक टाइड'ला आलेलं नवं उधाण**
– अशोक राजवाडे

१३ **सत्यशोधक चळवळीचा वर्तमानाला दिशा देणारा ग्रंथ**
– संजय नगरकर

१८ **पारावरची नाटके सशक्त व्हायला हवीत!**
– केशव साठ्ये

२२ **मुर्दाड**
– दिलीप लाठी

२६ **सर्व अंशातून आपण** The co-ordinates of us
**द्वैभाषिक अनुबोध**
– नीला भागवत

३० **पंतप्रधान नेहरूंच्या कर्तबगारीचा वस्तुनिष्ठ आलेख**
– राधाकृष्ण मुळी

३४ **आडातलं : मानवी गुंतागुंत उजागर करणाऱ्या कथा**
– अरूणा सबाने

३७ **"स्वातंत्र्याचं झालं काय? आणि आमच्या हाती आलं काय?"**
– व्यंकाप्पा भोसले

३९ **प्रतिसाद**
– बाळकृष्ण शिंदे, ॲड. लखनसिंह कटरे, प्रभा पुरोहित,
– संतोष निवृत्तीराव लिमकर



Scanned with CamScanner

निमित्त

संजय नगरकर

# सत्यशोधक चळवळीचा वर्तमानाला दिशा देणारा ग्रंथ

भारताच्या समकालीन समाजवास्तवाचा विचार करता आज सर्वत्र भयग्रस्ततेचे वातावरण निर्माण झालेले दिसते. सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या नावाखाली होणारे दमन, साहित्याच्या क्षेत्रातील एका लेखकाचा मृत्यू, जातीय अस्मितेचा वाढता टोकदारपणा, माध्यमक्रांतीने संपूर्ण जग कवेत घेतलेले असताना निसटू पाहणारा विवेकवाद, मानसिक शांतीसाठी फुटलेले बाबा-बुवांचे पेव अशा एक ना अनेक गोष्टींमुळे समाजमन बधिर झालेले असताना, कुठेतरी आशेची एखादी चांदणी लुकलुकावी तसा एक ग्रंथ हाती आला तो म्हणजे जी.ए. उगले या सत्यशोधक लेखकाचा 'सत्यशोधक दिनमित्रकार मुकुंदराव पाटील (जीवनकार्य आणि लेखनसमीक्षा)' हा ग्रंथ. खरे तर ज्या काळात अशा ग्रंथाची गरज होती अशाच काळात प्रकाशित झालेला, भूतकाळावर चढलेली पुटे बाजूला सारून सत्यशोधक विचारांच्या चळवळीचा दस्तऐवज असलेला हा ग्रंथ साकार करून जी.ए. उगले यांनी फार मोठे ऐतिहासिक व सामाजिक कार्य केले आहे. उगले यांनी आयुष्यभर सत्यशोधक विचारांची कास धरून लेखनकार्य केले. त्यातीलच हा ग्रंथ म्हणजे संशोधकीय शिस्त व वाचनीय लेखनशैली यांचे उत्तम उदाहरण आहे. त्याविषयी आपली भूमिका विशद करताना ते अत्यंत विनम्रतेने लिहितात की, सत्यशोधक मुकुंदराव पाटलांसारख्या अथांग सागराला कवेत नाही; पण हाताच्या ओंजळीत सामावून घेण्याचा माझ्या मर्यादेत केलेला हा प्रयत्न आहे. प्रस्तुत चरित्रलेखनप्रसंगी ओंजळीतून जे जल निसटले ते माझ्यामुळे. आणि जे काही ओंजळीला थेंब चिटकले ते सत्यशोधक चळवळीमुळे. आणि ते खरेही आहे. सत्यशोधक मुकुंदराव पाटील हे खरोखर अथांग सागर असल्याचा, बहुप्रसवा लेखक व सत्यशोधक विचारांचा खरा वारसदार असल्याचा प्रत्यय या ग्रंथातून येतो.

१९१०पूर्वीचा व नंतरच्या ५०-६० वर्षांचा विचार करता महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, राजर्षी शाहू महाराज यांनी पेरलेल्या सत्यशोधक विचारांचे सुमधुर फळ म्हणजे मुकुंदराव पाटील होत. महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापन केलेल्या सत्यशोधक

हा ग्रंथ दिनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचा चरित्रग्रंथ असला, तरी त्याचे दोन विभाग आहेत. जीवनकार्य या भागात मुकुंदराव पाटील यांचा जीवनपट ओघवत्या शैलीत मांडून, दुसऱ्या भागात त्यांच्या संपूर्ण लेखनाचा विवेचक धांडोळा घेतला आहे. प्रसंगी भाष्य करताना समीक्षात्मक टीकाही केलेली आहे. संशोधकीय शिस्त पाळताना स्थळ-काळाचे सूक्ष्म संदर्भदेखील दिलेले आहेत. मुकुंदरावांनी 'दिनमित्र' हे पहिले ग्रामीण पत्र चालविताना घेतलेले कष्ट, आर्थिक ओढगस्तीतही व्रतस्थपणे चालविलेले हे पत्र, त्याचे केले जाणारे वितरण, सनातन्यांच्या हल्ल्याला समर्थपणे परतवून लावताना लढविलेल्या क्लृप्त्या, अग्रलेख, कविता, नाटक, सिनेपटकथा, कथा, कादंबरी, बालसाहित्य, अध्यक्षीय भाषणे अशा विविध साहित्यप्रकारांतून केलेले एकटाकी लेखन वाचताना आपण थक्क होतो.



Scanned with CamScanner

समाजाला शिखरावर नेण्याचे कार्य मुकुंदराव पाटील यांनी आपल्या वाणीने, लेखणीने व कृतीने केले; परंतु महात्मा फुले यांच्या तुलनेत सत्यशोधक मुकुंदराव पाटील दुर्लक्षित राहिले. मराठी साहित्याचा इतिहास मांडणाऱ्या सारस्वतांनी व समीक्षकांनी एक प्रकारे त्यांना अनुल्लेखाने मारले, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. जर या काळातील साहित्य अभ्यासकांनी मुकुंदरावांच्या लेखनाची योग्य दखल घेतली असती, तर नक्कीच मराठी वाङ्मयाच्या इतिहासाला नवी कलाटणी मिळाली असती. मराठी साहित्याच्या वाटचालीत महात्मा फुले यांच्यापासून सुरू झालेली सत्यशोधकी साहित्याची परंपरा कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, जेधे-जवळकर व मुकुंदराव पाटील यांनी समृद्ध केली; परंतु साहित्याच्या इतिहासकारांनी या सर्व सत्यशोधकी साहित्याकडे साफ दुर्लक्ष केले. साहित्याच्या इतिहासात जे वेगवेगळे कालखंड वेगवेगळ्या लेखकांच्या नावांनी ओळखले जातात, त्यावर पांढरपेशी, मध्यमवर्गीय, शहरी, प्रस्थापित लेखकांचा वरचश्मा दिसतो. मुकुंदराव पाटलांच्या बहुविध सत्यशोधकी साहित्याची योग्य नोंद न घेतल्यामुळे हा इतिहास अपुराच राहतो. प्रा.डॉ.सुधाकर शेलार यांनी आपल्या दीर्घ प्रस्तावनेतून यावर नेमके बोट ठेवले आहे. ते म्हणतात, मुकुंदरावांची प्रतिभा इतकी सक्षम आणि प्रभावी होती की, निव्वळ कपोलकल्पितात ती रमली असती तर फडके-खांडेकरांच्या नावाने उल्लेखिले जाणारे मराठी साहित्यातील युग मुकुंदरावांच्या नावाने ओळखले गेले असते. परंतु मुकुंदरावांनी आपल्या लेखनातून नेहमीच सत्यनिष्ठ, बहुजनवादी वास्तव व प्रस्थापितांविरोधी विचार मांडल्यामुळे साहित्याच्या वारुळाला विळखा मारून बसलेल्या समीक्षकांनी त्यांच्या साहित्याविषयी 'ब्र'देखील काढला नाही. ही कसर विसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी श्रीराम गुंदेकर, जी.ए. उगले यांच्यासारख्या सत्यशोधकी अभ्यासकांनी भरून काढली आहे. सत्यशोधक समाजाला २४ सप्टेंबर २०२२ रोजी १५०वर्षे होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर २४ सप्टेंबर २०२१ रोजी प्रकाशित झालेला 'सत्यशोधक मुकुंदराव पाटील (जीवनकार्य व लेखनसमीक्षा)' हा ग्रंथ त्या संदर्भातील एक मेरुमणी ठरावा.

हा ग्रंथास प्रा.डॉ.सुधाकर शेलार यांची प्रस्तावना आहे. लेखकाची भूमिका व अनुक्रमणिका यासाठी पृष्ठे खर्च झाली आहेत. हा दस्तऐवज एकविसाव्या शतकातील नवपिढीपुढे खुला करण्यासाठी व सदर ग्रंथलेखकाला प्रोत्साहन देऊन ग्रंथ साकार करण्याचे शिवधनुष्य प्रा.डॉ.सुधाकर शेलार व प्रा.डॉ. शिरीष लांडगे यांनी उचलले. त्या संदर्भातील निर्मितिप्रक्रिया पाहणेदेखील महत्त्वाचे आहे; कारण धूसर होऊ पाहणारा सत्यशोधक समाजाचा इतिहास व मुकुंदराव पाटील यांचे कार्यकर्तृत्व उजागर होण्यास या ग्रंथामुळे मदत झाली. हा महत्त्वपूर्ण दस्तऐवज प्रकाशित करण्यासाठी सुरुवातीला किमान ३० लोकांकडून रुपये ५०००/- घेऊन तितक्याच किमतीच्या २० प्रती प्रत्येकाला दिल्या जातील असे निवेदन जाहीर केले. ग्रंथ माफक किमतीत उपलब्ध करून देण्यासाठी अक्षरवाङ्मय प्रकाशनाचे श्री. बाळासाहेब घोंगडे पुढे आले. या निवेदनाला बौद्धिक क्षेत्रातील ६१ व्यक्तींनी भरभरून प्रतिसाद दिल्यामुळे ग्रंथाची प्रथम आवृत्ती १००० ऐवजी २००० प्रतींची काढण्याचा निर्णय झाला. हा अलीकडच्या काळातील सामूहिक निर्मितिप्रक्रियेचा एकमेवाद्वितीय नमुना ठरेल. यावरून "सारेच दीप न मंदावले आता," असे म्हणावेसे वाटते. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांतील विवेकी व विचारी लोक अजूनही जागृत आहेत. सत्यशोधक विचारांना जिवंत ठेवण्याची तळमळ त्यांच्या मनी आहे, असे वाटते. प्रोत्साहनपर दिलेल्या रकमेतून प्रत्येकाला मिळणाऱ्या २० प्रती बहुजन समाजातील किमान २०० लोकांपर्यंत पोहोचतील. आणि त्यातील विचार २००० हून अधिक वाचकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

हा ग्रंथ दिनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचा चरित्रग्रंथ असला, तरी त्याचे दोन विभाग आहेत. 'जीवनकार्य' या भागात मुकुंदराव पाटील यांचा जीवनपट ओघवत्या शैलीत मांडून, दुसऱ्या भागात त्यांच्या संपूर्ण लेखनाचा विवेचक धांडोळा घेतला आहे. प्रसंगी भाष्य करताना समीक्षात्मक टीकाही केलेली आहे. संशोधकीय शिस्त पाळताना स्थळ-काळाचे सूक्ष्म संदर्भदेखील दिलेले आहेत. मुकुंदरावांनी 'दिनमित्र' हे पहिले ग्रामीण पत्र चालविताना घेतलेले कष्ट, प्रतिकूल परिस्थितीशी केलेला सामना, आर्थिक ओढगस्तीतही व्रतस्थपणे चालविलेले हे पत्र, त्याचे केले जाणारे वितरण, सनातन्यांच्या हल्ल्याला समर्थपणे परतवून लावताना लढविलेल्या क्लृप्त्या, अग्रलेख, कविता, नाटक, सिनेपटकथा, कथा, कादंबरी, बालसाहित्य, अध्यक्षीय भाषणे अशा विविध साहित्यप्रकारांतून केलेले एकटाकी लेखन वाचताना आपण थक्क होतो. आणि हे सर्व



Scanned with CamScanner

लेखन वाचताना सत्यशोधक विचारांचे सूत्र कोठेही सुटलेले नाही याचा प्रत्यय येतो. विडंबनात्मक उपहासप्रचुर शैलीमुळे त्यांचे लेखन कंटाळवाणे होत नाही, हे खरे असले तरी त्यामागे समाजातील कर्मठता, भोंदूगिरी, बहुजनांचा धर्मभोळेपणा, शेतकऱ्यांच्या दुरवस्थेस कारणीभूत अज्ञान व अंधश्रद्धा, भट-ब्राह्मणांचा कावेबाजपणा, अनिष्ट रूढी-परंपरा, पुराणग्रंथांचे थोतांड यांचा सत्यशोधकीय मताने झाडोरा घेतला आहे. त्यामुळे हा ग्रंथ केवळ एक चरित्रग्रंथ राहत नाही तर सत्यशोधक चळवळीच्या विचार वाटचालीचा दस्तऐवज ठरतो. तसेच समीक्षेच्या अंगाने हा चरित्रग्रंथ साकार करताना कोठेही निरसता येणार नाही याची काळजी घेतली आहे.

मुकुंदराव पाटील यांचे वैयक्तिक जीवन व सार्वजनिक जीवन यांत कोणतेही द्वैत नाही. सत्यशोधक भालेकर घराण्याचा वारसा लाभलेल्या मुकुंदरावांचे वडील 'दीनबंधू'कार कृष्णराव भालेकरांनी महात्मा फुले यांचा विचार पुढे नेण्यासाठी आपल्या वाट्याला आलेल्या १४ एकर जमिनीपैकी काही एकर जमीन विकून पत्र चालविले. जंगली महाराजांच्या व्याख्यानाने प्रभावित होऊन धर्मासंदर्भात पुरोहितशाहीचा खरा चेहरा लक्षात आला व पुढे आयुष्यभर सत्यशोधक विचारांचा प्रचार-प्रसार त्यांनी केला. हाच वारसा पुढे चालविणारे मुकुंदराव हे त्यांचे चौथे अपत्य. त्यांचा जन्म, बालपण, शिक्षण यांविषयी असलेल्या मतमतांतरावर प्रकाश टाकून ग्रंथकारांनी मुकुंदरावांच्या दत्तक विधानापर्यंतचा पट संशोधकीय वृत्तीने मांडला आहे. तसेच तत्कालीन कर्मठ प्रवृत्ती, त्यांच्या सत्यशोधक विवाहाची हकिकत, सनातन्यांनी त्यांच्या विरुद्ध केलेल्या कागाळ्या व हिकमती, मुकुंदरावांनी अनेक क्लृप्त्या लढवून त्यावर केलेली मात अशा संघर्षमय जीवनचरित्रावर प्रकाश टाकला आहे. तसेच वडील भालेकरांच्या सानिध्यात राहून विद्यापीठात उपलब्ध नसलेले जीवननिष्ठ शिक्षण त्यांनी भालेकरांकडून प्राप्त केले. ते आयुष्यभर सर्जनशील विद्यार्थी होते. असे भाष्य केले आहे. मुकुंदराव कृष्णराव भालेकर हे वयाच्या आठव्या वर्षी ७ ऑगस्ट १८९३ रोजी दत्तक विधानाने मुकुंदराव सखाराम पाटील कसे झाले? याचा वृत्तान्त येथे दिला आहे. मुकुंदरावांचे सत्यशोधकीय पद्धतीने झालेले लग्न, धाकटी बहीण विठाबाईचे लग्न, सत्यशोधकीय जलसे, प्रथम पत्नीचे निधन व द्वितीय विवाह, माधवराव, सदाशिवराव व



डॉक्टर रामचंद्रराव यांचा अल्प परिचय, एन्फ्लुएन्झाच्या साथीत आलेले बंधूचे व प्रथम पत्नीचे निधन, 'दिनमित्र' पत्राचे सोमठाणे येथून तरवडी येथे झालेले स्थलांतर अशी सर्व हकिकत मुकुंदरावांच्या वैयक्तिक जीवनकहाणीवर प्रकाश टाकते. पुढे सत्यशोधक विचारधारेच्या प्रचार-प्रसारासाठी मुकुंदरावांनी केलेला संघर्ष व त्यासाठी लिहिलेल्या बहुविध लेखनाचा धांडोळा या ग्रंथातून घेतला आहे.

तरवडीसारख्या छोट्या खेड्यात दळणवळणाच्या साधनांचा अभाव असतानाही 'दिनमित्र' या पत्राचा प्रपंच त्यांनी कसा सांभाळला असेल, याविषयी आश्चर्य वाटते. कारण १९११पर्यंत या पत्राचे कराची, पेशावर, अंदमान, निकोबार, सिंगापूर, बेळगाव, धारवाड, इंदूरपर्यंत अंक पोहोचत असत. या काळात तीन हजारांहून अधिक वर्गणीदार असल्याचे पाहून, वरील विधानाची यथार्थता लक्षात येईल. या पत्रामधून मुकुंदरावांनी सत्यशोधक चळवळीचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला. तसेच शिक्षण हे अमृत असल्याचे नमूद करून 'शेतकऱ्यांची निकृष्ट परिस्थिती आणि ती घालविण्याचे उपाय' या विषयावर अग्रलेखमाला चालविली. लोकहितवादींच्या 'शतपत्रां'चा आधार घेऊन त्यांनी 'दिनमित्र' हे पत्र चालविले. त्यात 'नांगऱ्या' या टोपणनावाने भिक्षुकशाहीवर ओढलेल्या असूडाच्या फटक्यामुळे 'दिनमित्र'वर जमीसारख्या संकटाचीदेखील सावली पडली. या पत्रातून विविध सदरे, कविता, कथा, कादंबऱ्या, नाटक, पटकथा,

अग्रलेख असे साहित्याचे अनेक रचनाबंध हाताळले आहेत. एवढेच नव्हे तर अनेक परिषदांच्या अध्यक्षीय भाषणातून आपल्या अमोघ वक्तृत्व शैलीने भिक्षुकशाहीवर बोचकारे ओढले आहेत. आपल्या भाषणातून 'क्षत्रिय' या शब्दाला विरोध करताना क्षत्रिय म्हणून घेण्यात जनहित नाही, कारण क्षत्रिय वर्ण मान्य करावयाचा तर शूद्र वर्ण मान्य करावा लागतो. त्यामुळे जाती-जातींची भिंत अधिक मजबूत होते. या क्षत्रियत्वाच्या भूलथापेने बंधुप्रेम रोगट झाले आहे. आपण त्यामुळे गुलाम राहिलो, असे प्रतिपादन ते करतात. विविध प्रकारच्या जाती व समूह आपल्या मागे 'क्षत्रिय' हा शब्द आजही वापरतात. त्यातून आजच्या वर्तमानातही त्यांचे विचार कसे मार्गदर्शक ठरतात, याचा प्रत्यय येतो. त्यांच्या वाचन, लेखन, संपादन व वक्तृत्व यांच्या चौफेर आविष्कारामुळे लेखक त्यांना 'सत्यशोधकीय मुक्त विद्यापीठाचे आचार्य' संबोधतात.

'दिनमित्र' हे पत्र सुरू करण्यापूर्वी मुकुंदरावांनी लिहिलेल्या 'सुबोध श्लोक' (पद्य) व 'हिंदू आणि ब्राह्मण' (गद्य) या ग्रंथांचे लेखन केले. त्यांचाही परिचय सदर ग्रंथातून करून दिला आहे. या ग्रंथांची संवादात्मक शैली, आशय-विषयाचे सत्यशोधक विचारांशी असलेले नाते, महात्मा फुले व कृष्णराव भालेकरांच्या लेखनाचा प्रभाव ही वैशिष्ट्ये स्पष्ट करून तमाम हिंदू हे सकल हिंदू आहेत, या ब्राह्मण्यग्रस्त विधानाला स्वतः मुद्देसूद, वस्तुनिष्ठ, सविस्तर छेद देणारा हा मराठी वाङ्मयातील पहिलाच ग्रंथ असावा असे भाष्य जी.के. उगले करतात.

तमाशासदृश बतावणीच्या धरतीवर सत्यशोधकी जलशांसाठी लिहिलेली 'शास्त्रोक्त गप्पा' ही संहिता 'दिनमित्र'मधून क्रमशः प्रसिद्ध झाली. एकूण १३ शास्त्रोक्त गप्पांचे हे सदर ब्राह्मणी व्यवस्थेवर व कपोलकल्पित पुराणकथांवर केलेले भाषण. त्या संदर्भात लेखक उगले यांनी नशीबवादाचा अथवा प्रारब्धाचा प्रभाव असलेल्या अशा पराभूत मानसिकतेचा समाचार घेतला आहे, असे विधान केले आहे.

'देवांची परिषद' (०१ व ०२) या सन १९१० ते १९२४ या १३-१४ वर्षांच्या कालखंडातील विविध जातिसमूहांच्या परिषदा, अधिवेशने यांची वार्तांकने 'दिनमित्र'मधून प्रसिद्ध झाली. त्यांचाही परिचय सदर ग्रंथातून करून दिला आहे. देवांचे मानवीकरण, पुजाऱ्यांच्या अनैतिक लीला, पुरोहितशाही हटाव, शोषण, भ्रष्टाचार आणि व्यभिचार यांवर झालेल्या चर्चांवर उपहासात्मक शैलीत प्रकाश टाकलेला आहे. त्याचा परिपाक म्हणजे सन १९२६ मध्ये सत्यशोधक सी.के. बोले यांनी मांडलेले 'जोशी वतन रद्द करण्याचे बिल' व मुंबई कौन्सिलमध्ये ते संमत होऊन पुरोहितांचे हक्क नष्ट होण्यात झालेली त्याची परिणती होय.

'चोरांची परिषद', 'असुडाचे फटके', 'काठीचे सपाटे', 'पेशवाईतील मौजा', 'सारासार विचार', 'टाचेचे गुद्दे', 'मनोरंजक संवाद', 'पिंपळाचा पार', 'धर्मगुरू म्हणविणारास ताकीद' यासारख्या सदरांचा परिचय करून देताना उगले यांनी म्हटले आहे की, तत्कालीन मराठी साहित्यविश्वात वाचकप्रिय असलेल्या 'चोरांचे संमेलन' (श्री.कृ. कोल्हटकर), 'वत्सला वहिनी' (अ.ब. कोल्हटकर) अशा अनेक प्रकारच्या विनोदी, विडंबनात्मक, उपहासप्रचुर लेखनाच्या धर्तीवर मुकुंदरावांनी सत्यशोधकी विचारांचा बाज न सोडता वाचकांना बांधून ठेवण्याचा प्रयत्न केला. कालानुरूप लेखनशैलीत बदल केला तरी आपल्या विचारांच्या मांडणीशी त्यांनी तडजोड केली नाही. प्रस्थापित लेखकांच्या केंद्रस्थानी शहरी, पांढरपेशी, मध्यम वर्ग होता, तर मुकुंदराव पाटलांच्या समोर ग्रामीण भागातील शेतकरी होता. डॉ.अशोक एरंडे व स.मु. पाटील यांच्या मतांचा आधार घेऊन उगले यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीत 'कोपरखळ्या', 'धक्के बुक्के', 'वाऱ्यावरची वरात' आदी प्रसिद्ध सदरांचे आद्य प्रवर्तक मुकुंदराव पाटलांचे 'असुडाचे फटके' हेच असल्याचे आचार्य अत्रे यांनी म्हटले आहे. या मुकुंदराव पाटील यांच्या लेखनाच्या आद्य प्रवर्तकत्वावर प्रकाश टाकला आहे. तसेच 'काठीचे सपाटे' या वृत्तमालिकेच्या बाबतीत सदर लेखन मुकुंदराव पाटील यांचे आहे की नाही, याविषयी असलेल्या मतमतांतरावरदेखील भाष्य केले आहे.

मुकुंदराव पाटील हे कवीही होते. त्यांच्या काव्यलेखनावर प्रकाश टाकताना 'सुबोध श्लोक', 'कुलकर्णी लीलामृत', 'शेठजी प्रताप', 'देशभक्त लीलासार' यांसारख्या काव्यग्रंथांचा परिचय करून दिला आहे. ग्रामीण भागातील समाज हा धर्मभोळा, धर्मप्रवण असतो. भागवतातील कथांचा, विविध व्रतवैकल्यप्रसंगी 'शिवलीलामृत', 'पांडव प्रताप' यांसारख्या ग्रंथांची पारायणे तो करतो. नकळतपणे ब्राह्मण्यग्रस्त होतो. हे हेरून



Scanned with CamScanner

त्या धर्तीवर मुकुंदराव पाटलांनी वरील काव्यग्रंथांची रचना केली आहे. या ग्रंथांचा आशय, त्यांची काव्यलेखनशैली, रचनावैविध्य यांवर मार्मिक असे भाष्य करून, उगले कवी मुकुंदरावांच्या काव्यलेखनसामर्थ्यावर प्रकाश टाकतात.

'राक्षसगण', 'हेड मिस्ट्रेस' ही नाटके व 'पतीचा पाठलाग' ही पटकथा लिहिणारे मुकुंदराव पाटील हे बहुप्रसवा लेखक असल्याचा प्रत्यय येतो. समकालातील मराठी नाटक व रंगभूमीवरदेखील त्यांचा कटाक्ष होता, हेच यातून प्रत्ययास येते. त्यांच्या नाट्यलेखनाचा प्रयोग फारसा यशस्वी झाला नसला, तरी सत्यशोधकी विचारांच्या प्रचार-प्रसारासाठी जे जे म्हणून लेखनसाधन वापरता येईल, ते ते त्यांनी हाताळण्याचा प्रयत्न केला. ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रंथकार उगले यांनी या ग्रंथातून त्याचाही धांडोळा घेतला आहे. त्यामुळे हे चरित्र सर्वांगाने परिपूर्ण होण्यास मदत झाली आहे.

मुकुंदराव पाटलांचा सर्वाधिक चर्चिला गेलेला व स्वतंत्र संपादने झालेला लेखनप्रकार म्हणजे, त्यांची कथा आणि कादंबरी होत. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचा धांडोळा घेताना जी.ए. उगले लिहितात की, सत्यशोधकी विचारधारांच्या प्रचार-प्रसारासाठी हे साधन मुकुंदराव पाटील यांनी प्रभावीपणे वापरले आहे. त्यांच्या कथांच्या संख्येवरूनदेखील मतमतांतरे आहेत. या कथांचे प्रकाशन त्या काळातील किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, महाराष्ट्र शारदा यांसारख्या बहुचर्चित नियतकालिकांतूनदेखील झाले. या कथांमधून खेड्यातील शेतकरी, कष्टकरी, शेतमजुरांच्या दुरवस्थेचे मुख्य कारण धर्मभोळेपणा असल्याचे चित्रण येते. त्यातील काही कथांचा आशयही उगले यांनी उलगडून दाखविला आहे. तसेच 'होळीची पोळी', 'चंद्रलोकीची विलक्षण रूढी' अथवा 'आमच्या दादासाहेबांची फजिती', ढहाशास्त्री परान्ने', 'तोबा तोबा' 'राष्ट्रीय तारुण्य' या कादंबऱ्यांची आशयसूत्रे, रचनावैशिष्ट्ये, शैलीचे वेगळेपण, पात्रचित्रणे यांच्या वेगळेपणावर उगले यांनी प्रकाश टाकून प्रसंगी समीक्षात्मक अंगाने भाष्यही केले आहे. या कादंबऱ्यांची सूत्रेदेखील केवळ मनोरंजन नव्हे तर तत्कालीन समाजव्यवस्थेवरील भाष्य आणि सत्यशोधकीय विचारांचा गाभा असल्याचे दिसते.

जी.ए. उगले यांनी सदर ग्रंथातून पुढे 'बालसाहित्यिक मुकुंदराव पाटील', 'मुकुंदरावांची अध्यक्षीय भाषणे', 'दिनमित्र पत्रातील अग्रलेख' या लेखांमधून मुकुंदराव पाटील यांच्या सर्वांगीण लेखनप्रपंचाचे, वक्तृत्वशैलीचे कंगोरे उलगडून दाखविले आहेत. 'प्रिय माझी आई' या त्यांच्या एकमेव कवितेतील मातृभक्त बालकवी मुकुंदराव, विविध सत्यशोधक अधिवेशने व परिषदांमधून मुद्देसूद व तर्कनिष्ठ मांडणी करणारे मुकुंदराव, अग्रलेखांमधून दांभिकतेवर कोरडे ओढणारे मुकुंदराव- अशी विविध रूपे उलगडून दाखविलेली आहेत. गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून होणारे विविध जातींचे मेळावे ही काही फक्त वर्तमानातीलच बाब नाही, तर त्याही काळात असे जातींचे व समाजाचे मेळावे होत असत. फरक एवढाच की त्या काळातील मेळावे व अधिवेशनात सर्व समाजाच्या अवनतीचे मूळ धर्मभोळेपणा, अज्ञान, अंधश्रद्धा, रूढीप्रियता, व्रतवैकल्यांचा सुळसुळाट, पोटार्थी पुरोहितशाही असल्याच्या सत्यावर प्रकाश टाकला जात असे. प्रबोधन केले जात असे. आज होणाऱ्या मेळाव्यांमध्ये जातीय अहंकार, स्वार्थ, अभिनिवेश पाहावयास मिळतो. आणि म्हणूनच हा ग्रंथ वर्तमान वास्तवात आपणां सर्वांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालतो. सत्याची जाणीव करून देतो. सत्यशोधक समाजाला आता १५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या धर्तीवर त्याची निकडही प्रतिपादन करतो. सदर ग्रंथ खऱ्या अर्थाने 'सत्यशोधक दिनमित्रकार मुकुंदराव पाटील (जीवनकार्य व लेखनसमीक्षा)' या नामाभिधानास खरा उतरला आहे असे वाटते.

**प्रा. डॉ. संजय नगरकर**, कर्जत, जि.अहमदनगर
sapan.09@rediffmail.com
Mob. 9096875737

**सत्यशोधक दिनमित्रकार मुकुंदराव पाटील**
(जीवनकार्य आणि लेखनसमीक्षा),
लेखक : **जी. ए. उगले**
अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे

(सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला २४ सप्टेंबर २०२२ रोजी, १५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने हा लेख प्रसिद्ध करीत आहोत.)



Scanned with CamScanner